सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

स्वागत मूल्य १ रु.

https://epaper.globalmahatej.com/

वर्ष १ ले | अंक : ३१ | रविवार, दि. २६ ऑक्टोबर २०२५ | पाने : ४

अमळनेर | किंमत : १ रु. | Email - globalmahatej@gmail.com

## दिनविशेष

२६ ऑक्टोबर

- हूवर धरणातील पहिले विद्युत जनरेटर पूर्णपणे कार्यान्वित झाले.
- जम्मू-काश्मीर राज्य भारतात विलीन झाले.
- 'रायगडाला जेव्हा जाग येते' या नाटकाचा पहिला प्रयोग मुंबई येथील भारतीय विद्याभवन येथे झाला.
- कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण प्रतिबंधक नियम लागू झाले.

## गर्व से कहो स्वदेशी है हम...! स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

**स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!**

## आतील पानांत



# अमळनेरमध्ये वाळूचा 'खुलेआम' बाजार!

## प्रशासन कुंभकर्णी झोपेत; वाळूमाफियांची दिवाळीत चांदीच चांदी...!!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**रजनीकांत पाटील**

शहरात अवैध वाळू व्यवसाय चांगलाच फोफावला आहे. गल्ली-बोळांमध्ये भाजी विक्रेते जसे 'भाजी घ्या.. भाजी' असा आवाज देतात तसाच काहीसा प्रकार 'वाळू घ्या... वाळू!' असा प्रकार सर्वत्र सुरु असल्याचे दिसून येत आहे. जणू काही भाजी विकावी तसे खुलेआम वाळूची अवैध विक्री सुरू आहे. प्रशासन, पोलीस आणि महसूल विभाग यांच्या डोळ्यांदेखत हा व्यवसाय सुरू आहे. वाळूमाफियांची दिवाळीत चांदीच चांदी झाली आहे.

धुळे रोड, आर. के. नगर, स्टेशन रोड, तसेच कॉलनी भागांतून छोट्या टेम्पो, रिक्षा आणि पिकअपद्वारे वाळूची वाहतूक निर्भयपणे सुरू आहे. शहराच्या मुख्य रस्त्यांपासून अरुंद गल्लीपर्यंत वाळुची 'घरपोच सेवा' नागरिकांना सहज मिळते. दिवसाढवळ्या धुळे रस्त्यावरून जाताना वाळूने भरलेले टेम्पो आणि रिक्षा सर्रास दिसतात. दिवाळीच्या सुट्टीत प्रशासन " सुट्टीच्या मूड "मध्ये असल्याने वाळूमाफियांकडे कोणाचेच लक्ष नाही. बांधकामधारकांना सहज मिळणारी ही वाळू केवळ अनधिकृत व्यवहारातून विकली जात आहे. त्यातून लाखो रुपये काही जणांच्या खिशात जात आहेत. महसूल खात्याच्या नोंदीत या व्यवहाराचा मागमुसही नसल्याचे दिसून येत आहे.

रात्रीच्या वेळी नदीकाठांवरून मोठ्या प्रमाणावर वाळू उपसा केला जातो. त्यानंतर वाहने भरून शहरात आणली जातात. पहाटेपासूनच विक्री सुरू होते. या वाळुच्या अवैध व्यवसायामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. नदीपात्रातील जलस्तर दिवसेंदिवस घटताना दिसून येत आहे. मात्र, तरीही प्रशासनाने डोळेझाक केली आहे. पर्यावरणप्रेमींमध्ये याबाबत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. महसूल विभागाचे कर्मचारी आणि पोलिसांनी मिळून जर सातत्याने कठोर कारवाई केली, तर वाळूमाफियांचे पितळ उघडे पडणार आहे. मात्र, त्यांचेही खिसे वाळूमाफियांकडून भरले जात असल्याचा आरोप होत आहे. नद्यांमधील वाळूचा बेसुमार उपसा केल्याने पाणी साठवण क्षमता घटते, झऱ्यांचे प्रवाह कमी होतात, शेतीवर परिणाम होतो. ही केवळ महसुली नाही, तर पर्यावरणीय आपत्ती आहे, असे एका पर्यावरणप्रेमीने ' ग्लोबल महातेज' शी बोलताना सांगितले.



## श्री मंगळग्रह मंदिरात महाआरती..!




दिवाळी पर्वाच्या सांगतेनंतर शनिवार, दि. २५ ऑक्टोबर रोजी सायंकाळी श्री मंगळग्रह मंदिरातील महाआरतीप्रसंगी भाविकांनी केलेली गर्दी. इन्सेटमध्ये सपत्नीक महाआरती करताना श्री. अमित महाजन.

( छायाचित्रे : नितेश बारी )

# राज्यात ' नैसर्गिक शेती मिशन'

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची घोषणा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्यपाल आचार्य देवव्रत यांच्या नेतृत्वाखाली राज्यात ' नैसर्गिक शेती मिशन ' सुरू केले जाईल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सूचनेनुसार शुक्रवार, दि. २४ ऑक्टोबर रोजी राजभवन येथे राज्यातील मंत्री, आमदार आणि खासदारांसाठी ' नैसर्गिक शेती ' या विषयावरील चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी ही घोषणा केली. मुख्यमंत्री म्हणाले, की राज्यपालांच्या नेतृत्वाखाली राज्यात प्राकृतिक शेती मिशन सुरू करत आहोत. ज्यातून शेतकऱ्यांचा उत्पादनखर्च कमी होईल, उत्पादकता वाढेल, जमिनीची क्षमता आणि कस वाढेल, त्यातून शेती फायद्याची होईल. वातावरण बदलावरही हा रामबाण उपाय आहे. रासायनिक शेतीमुळे जमीन वाळवंट होत आहे. जमीन, पाणी व हवा प्रदूषित होत आहे. अन्नधान्य विषयुक्त होत आहे. भावी पिढी आरोग्यवान व्हावी, याकरिता नैसर्गिक शेती अनिवार्य आहे, असे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी सांगितले.

### हमीभाव केंद्रावरच जा...

राज्यात यंदा कापूस आणि सोयाबीनचे मोठ्या प्रमाणात उत्पादन झाले आहे. शेतकऱ्यांनी कष्टाने पिकविलेला कापूस आणि सोयाबीन खरेदीसाठी राज्य सरकार राज्यभर खरेदी केंद्रे सुरू करणार आहे. शेतकऱ्यांनी या खरेदी केंद्रावरच आपला माल विकावा. खासगी व्यापारी त्यांचा माल हमीभावाने विकत घेत असेल, तरच तो खासगी व्यापाऱ्यांना विकावा, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी केले.



# तांबेपुरा रेल्वे बोगदा अंधारात!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शहरातील सुभाष चौकातून तांबेपुरा भागात जाणारा रेल्वे बोगदा आहे. मात्र, या बोगद्यात अनेक दिवसांपासून पथदिवे नसल्याने प्रवाशांसह नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. या बोगद्यातून पुढे अनेक गावांकडे जाणारा रस्ता आहे. बोगद्यात पथदिव्यांची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांसह प्रवाशांनी केली आहे.

या रेल्वे बोगद्यातून पुढे विप्रो कंपनी, तांबेपुरा, साने नगर तसेच विविध खेड्यांकडे जाणारा रस्ता आहे. या बोगद्यातून रोज हजारो नागरिक प्रवास करतात. मात्र, अंधारामुळे वाहनधारक, विद्यार्थी विशेषतः महिलांना अंधारातून मार्गक्रमणकरावे लागते. परिसरात कुठेही पथदिवे नसल्याने वाहनचालकांना अंदाज येत नाही. परिणामी लहान- मोठे अपघात वाढले आहेत. विप्रो कंपनीत जाणाऱ्या कर्मचाऱ्यांनाही याचा त्रास सहन करावा लागतो. सायंकाळनंतर पूर्ण अंधार होत असल्याने अडथळा निर्माण होतो. या अंधाराचा गैरफायदा घेऊन भुरटे चोरट्यांचा वावर या परिसरात वाढला आहे. यामुळे नागरिकांमध्ये भीती निर्माण झली आहे. याबाबत पालिका प्रशासनाने लक्ष देऊन पथदिवे तत्काळ बसवावेत, अशी मागणी होत आहे.



# बांगलादेशी घुसखोरांना बसणार आळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

राज्य सरकारने बांग्लादेशी घुसखोरांना आळा घालण्यासाठी मोठे पाऊल उचलले आहे. या घुसखोरांची काळी यादी तसेच शिधापत्रिका पडताळणी करण्याचे आदेश सरकारकडून देण्यात आले आहेत. यासोबतच नवीन शिधापत्रिकेसाठी नव्या मार्गदर्शक सूचनाही जारी करण्यात आल्या आहेत.याबाबत शासनिर्णय जारी करण्यात आला आहे.सरकारने उचललेल्या या पावलामुळे बांगलादेशी घुसखोरांना आळा बसणार आहे.तसेच उपाययोजनाचा अहवाल एटीएसकडे पाठवण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

# मृत्यूनंतरही अखेरची यात्रा खड्ड्यांमधूनच !

## पैलाड- स्मशानभूमीपर्यंत रस्त्याची दयनीय अवस्था

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर शहरातील पैलाडपासून ते स्मशानभूमीपर्यंत जाणारा मुख्य रस्ता अक्षरशः खड्ड्यांनी व्यापला आहे. या मार्गावरून जाणाऱ्या नागरिकांचा प्रवास जीवावर बेतला आहे. एवढेच नव्हे, तर मृत व्यक्तीची शेवटची यात्रा देखील खड्ड्यांमधूनच पार पडते. याकडे पालिकेने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

तालुक्याच्या दृष्टीने हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा आहे. अमळनेर- चोपडा या मुख्य मार्गाशी जोडणारा हा रस्ता आहे. सकाळपासून रात्रीपर्यंत छोट्या, मोठ्या आणि अवजड वाहनांची सतत वर्दळ या रस्त्यावर असते. मात्र, रस्त्याचे डांबर उखडून मोठमोठे खड्डे निर्माण झाले आहेत. पावसाळ्यानंतर या खड्ड्यांमध्ये चिखल साचल्याने पायी चालणेही अवघड झाले आहे. वाहनचालक अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करतात. हा प्रशासनाचा निष्काळजीपणाचा कळस आहे, अशी ओरड नागरिकांमधून होत आहे. दरम्यान, हाच मार्ग प्रसिद्ध श्री मंगळ ग्रह देवस्थानाकडे जातो. दररोज शेकडो भाविक दर्शनासाठी याच मार्गाने येता. मात्र, खड्डेमय रस्त्यामुळे वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागतो.

रस्त्याच्या दयनीय अवस्थेमुळे अनेक भाविकांनी सोशल मीडियावरून प्रशासनाला जागे करण्याचे प्रयत्न सुरू केले आहेत. भाविकांनी पालिका प्रशासनावर नाराजी व्यक्त केली आहे. रस्ते विकासाच्या घोषणा फक्त कागदावरच राहतात. प्रत्यक्षात निकृष्ट दर्जाची कामे झाल्याने रस्ते काही महिन्यांतच उखडतात. यामुळे जनतेनेच शासनाला कर रुपाने दिलेला कष्टाचा व घामाचा पैसा वाया जात आहे.



# मुंबई- नागपूर वातानुकूलित १ हजार ७०२ सुपरफास्ट रेल्वे धावणार !

## दिवाळी, छठ पूजेसाठी जळगाव, भुसावळच्या प्रवाशांची सोय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

दिवाळी आणि छठ पूजेच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांना घरी सुखरूप पोहोचता यावे, यासाठी मध्य रेल्वेने तब्बल १,७०२ विशेष गाड्या चालविण्याची घोषणा केली आहे.

जळगाव मध्य रेल्वेतर्फे प्रवाशांच्या सोयीसाठी दिवाळी तसेच छठ पुजेच्या काळातील वाढती गर्दी लक्षात घेऊन छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (मुंबई) आणि नागपूर दरम्यान अतिरिक्त वातानुकूलित सुपरफास्ट विशेष गाडी चालविण्यात येणार आहे. या गाडीला जळगाव तसेच भुसावळ स्थानकावर थांबा देण्यात आला आहे. या गाड्या मुंबईसह इतर प्रमुख स्थानकांमधून सुटतील आणि उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल तसेच ईशान्येकडील राज्यांकडे धावतील. प्रवाशांच्या सोयीसाठी अतिरिक्त तिकीट खिडक्या, होल्डिंग एरिया आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत. प्रवासाबाबत दिशाभूल करणाऱ्या चित्रफिती किंवा अफवा पसरवणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई करण्याचा इशारा मध्य रेल्वे प्रशासनाने दिला आहे. तसेच देशातील इतर अनेक ठिकाणी देखील या विशेष गाड्या सोडण्याचे नियोजन करण्यात आले आहे. दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे १२०० चौरस मीटर क्षेत्रफळाचे होल्डिंग क्षेत्र तयार करण्यात आले आहे. लोकमान्य टिळक टर्मिनस येथे १० हजार चौरस मीटर, पुणे स्थानकावर दोन हजार चौरस मीटर, नाशिक रोड स्थानकावर एक हजार चौरस मीटर आणि नागपूर स्थानकावर १५०० चौरस मीटर क्षेत्रफळाचे होल्डिंग क्षेत्र तयार करण्यात आले आहे. सर्व होल्डिंग क्षेत्रांमध्ये एकावेळी सुमारे २० हजार प्रवाशांना थांबण्याची सोय आहे. छप्पर असलेले शेड, पुरेसा प्रकाश, वायुवीजन, पिण्याचे पाणी, पंखे, शौचालये, चार्जिंग पॉइंट्स, खाद्यपदार्थांची दुकाने आणि प्रवाशांसाठी घोषणा प्रणालीची सोय त्याठिकाणी केली आहे. गाड्यांच्या वेळापत्रकासह इतर महत्त्वाची माहिती नियमितपणे जाहीर केली जात आहे.

दरम्यान, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस-नागपूर-छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस वातानुकूलित विशेष गाडी क्रमांक ०१००५ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथून शनिवारी पहाटे ००.२० वाजता सुटेल आणि नागपूर येथे त्याच दिवशी दुपारी ०३.३० वाजता पोहोचेल. गाडी क्रमांक ०१००६ वातानुकूलित सुपरफास्ट विशेष गाडी नागपूर येथून शनिवारी सायंकाळी ०६.१० वाजता सुटेल आणि छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस येथे दुसऱ्या दिवशी सकाळी ०८.२५ वाजता पोहोचेल. या गाडीला दोन्ही बाजुने २० वातानुकूलित तृतीय श्रेणी डब्यांसह दोन जनरेटर व्हॅन जोडल्या जातील. विशेष गाड्यांचे आरक्षण सर्व संगणकीकृत केंद्रांवर तसेच संकेतस्थळावर करता येणार आहे.





**टिप्स & ट्रिक्स :**

# बाहेर गेल्यावर या ठिकाणी फोन चुकूनही चार्ज करू नका, हॅक झालाच समजा!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सायबर सुरक्षा तज्ज्ञाच्या सल्ल्यानुसार सार्वजनिक चार्जिंग पॉईंट वापरल्याने वैयक्तिक माहिती चोरी किंवा मालवेअर येऊ शकतो. त्यामुळे तेथे मोबाईल चार्ज करणे टाळाच.

**घराबाहेर बॅटरी कमी झाली?**
**सार्वजनिक पोर्ट धोकादायक का?**

– हॅकर्स यूएसबी पोर्टमध्ये छेडछाड करतात.
– डेटा चोरी : संपर्क, मेसेज, फोटो, पासवर्ड, बँक डिटेल्स.
– मालवेअर इंजेक्शन : फोन कायमचा खराब होऊ शकतो.

एचजीडी इंडिया अहवालानुसार घाईत लोक सुरक्षेकडे दुर्लक्ष करतात.

**‘ या ’६ ठिकाणी चार्जिंग अजिबात करू नका.**

| ठिकाण | धोका काय? |
|---|---|
| विमानतळ | हॅकर्स डेटा चोरतात (जेसन ग्लासबर्ग) |
| रेल्वे/बस स्टेशन | बनावट यूएसबी पोर्ट संपर्क, फोटो चोरी (जॅक व्होंडर हाइड) |
| हॉटेल रूम | बेडसाईड यूएसबी हॅक मालवेअर येऊ शकतो |
| भाड्याची कार | यूएसबी पोर्ट डेटा चोरी + बॅटरी खराब (स्टेसी क्लेमेंट्स) |
| मॉल | कियॉस्क ई-मेल, पासवर्ड, बँक डिटेल्स चोरी |
| कॉफी शॉप | लपलेले डिव्हाइस मालवेअर इंजेक्ट |

**सुरक्षित पर्याय काय?**

१) पॉवर बँक नेहमी बाळगा (विश्वासार्ह ब्रँड)
२) वॉल सॉकेट + स्वतःचा चार्जर वापरा
३) डेटा ब्लॉक केबल (फक्त चार्जिंग, डेटा ट्रान्सफर नाही)
४) घरातून १०० टक्के चार्ज करून निघा.



# कराडच्या ६५ वर्षांच्या मंगल आजी रिक्षाचालक!

## धाडस आणि आत्मविश्वासाचा अनोखा प्रवास

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सातारा जिल्ह्यातील कराड शहरातील ६५ वर्षांच्या मंगल आबा आवळे या आजींचे नाव सध्या सगळीकडे चर्चेत आहे. या वयात त्यांनी केवळ नवे शिकण्याचे धाडस केले नाही, तर रोज रिक्षा चालवून स्वतःचा आणि कुटुंबाचा उदरनिर्वाहही सुरू केला आहे.

**आत्मविश्वासाने चालवली रिक्षा**

मार्च २०२५ पासून मंगल आजी कराड शहरात रिक्षा चालवत आहेत. त्यांचे हे पाऊल पाहून अनेकजण थक्क झाले आहेत. आयुष्यभर शेतमजुरी करत घर सांभाळणाऱ्या या आजींनी नवऱ्याच्या मृत्यूनंतर चार मुलांना शिक्षण देऊन उभे केले. मुलगा एस.टी. ड्रायव्हर झाल्यावर त्याने घेतलेल्या रिक्षेकडे पाहून आजींनी ठरवले, ‘ मलाही चालवायचेय! ’ सुरूवातीला वाहन चालवण्याचा कोणताही अनुभव नसतानाही त्यांनी आत्मविश्वासाने हातात स्टीअरिंग घेतले.

**सुरूवातीला केल्या मजेशीर चुका**

ब्रेकला ‘ हॅण्डल ’ आणि हॅण्डलला ‘ ब्रेक ’ म्हणत शिकण्याच्या सुरूवातीच्या मजेशीर चुका करत त्यांनी काहीच दिवसांत रिक्षा शिकून घेतली. त्यांच्या मेहनती आणि धडाडीमुळे स्थानिक आरटीओ अधिकाऱ्यांनी त्यांना परवाना मिळवून दिला. आज मंगल आजी रोज रिक्षा स्टॅण्डवर उभ्या राहून ग्राहकांना आवाज देतात. ग्राहक विचारतात, की ड्रायव्हर कुठे आहे? मी म्हणते, ‘ मीच ड्रायव्हर आहे! ’ हे सांगताना त्यांच्या चेहऱ्यावर झळकणारा आत्मविश्वास अनेकांना प्रेरणा देतो.

**कॉलेजच्या मुलींची आजींची रिक्षा**

कॉलेजच्या मुली तर ‘ आजींची रिक्षा आली ’ म्हणत खास त्यांच्या रिक्षेत बसतात. स्वतःच्या मेहनतीवर उभी राहिलेली ही आजी आज समाजातील सर्वांकडून दाद मिळवतेय. त्यांचा तरुणांना स्पष्ट संदेश आहे. ‘ धाडस वाढल्याशिवाय काही होत नाही. काम मिळत नाही म्हणून घरी बसू नका. कुठलेही काम मनापासून करा.’ मंगल आजींचा हा प्रवास ठरवतो वय हे फक्त एक आकडा आहे. जिद्द असेल तर आयुष्याची दिशा स्वतः ठरवता येते.



**सक्सेस स्टोरी...**

# साधारण किसान परिवार से निकली अनू बेनिवाल बनीं आयपीएस, ‘ ब्यूटी विद ब्रेन ’ की मिसाल



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

२०२२ बैच की आईपीएस अधिकारी अनु बेनिवाल उन महिला अधिकारियों में से हैं, जिन्हें सही मायनों में ‘ब्यूटी विद ब्रेन’ कहा जाता है। अपने चौथे प्रयास में यूपीएससी परीक्षा पास कर उन्होंने ऑल इंडिया रैंक २१७ हासिल की और मध्य प्रदेश कैडर में आईपीएस बनकर देशभर में चर्चा में आईं। अनु की प्रेरणादायक कहानी आज लाखों युवाओं के लिए मिसाल बन चुकी है, जो सिविल सेवा परीक्षा की तैयारी कर रहे हैं।

**शैक्षणिक उत्कृष्टता और वैज्ञानिक पृष्ठभूमि**

दिल्ली के पीतमपुरा में जन्मी अनु ने दिल्ली विश्वविद्यालय के हिंदू कॉलेज से फिजिक्स ऑनर्स में बी.एससी. और एम.एससी. की डिग्री हासिल की। उन्होंने नैनोसाइंस जैसे जटिल विषय पर शोध भी किया। उनकी शैक्षणिक उपलब्धियां उनकी मेहनत और लगन का प्रमाण हैं, जिसने उन्हें प्रशासनिक सेवा के लिए प्रेरित किया।

**साधारण पृष्ठभूमि, असाधारण उपलब्धि**

अनु का परिवार एक साधारण किसान परिवार से है। उनके पिता किसान हैं, और इसी सामान्य पृष्ठभूमि से निकलकर अनु ने असाधारण मुकाम हासिल किया। उनकी यूपीएससी यात्रा चुनौतियों से भरी थी। पहले प्रयास में वे प्रीलिम्स तक नहीं पहुंच पाईं, दूसरे प्रयास में मेन्स में असफल रहीं, और तीसरे प्रयास में AIR ६३६ के साथ DANIPS कैडर मिला। लेकिन अनु ने हार नहीं मानी। २०२२ में अपने चौथे प्रयास में उन्होंने AIR २१७ के साथ आईपीएस बनने का सपना साकार किया।

**प्रशासनिक कर्तव्यनिष्ठा**

अनु की कार्यशैली सख्त और प्रभावी है। ग्वालियर के बीजौली थाने में एसएचओ के रूप में उन्होंने रेत माफियाओं के खिलाफ कड़ी कार्रवाई कर खूब प्रशंसा बटोरी। वर्तमान में वे धार जिले के मनावर में एसडीओपी के पद पर कार्यरत हैं। १५ अगस्त २०२५ को उन्हें अपराध नियंत्रण और कानून व्यवस्था में उत्कृष्ट योगदान के लिए सम्मानित किया गया।

**सफलता का मंत्रः आत्मविश्वास और मेहनत**

अनु का मानना है कि स्व-अध्ययन, स्व-निर्मित नोट्स, और आंसर राइटिंग की नियमित प्रैक्टिस सफलता की कुंजी है। वे कहती हैं कि सही स्रोतों से पढ़ाई और दृढ़ संकल्प से कोई भी लक्ष्य हासिल किया जा सकता है। उनकी यह सलाह यूपीएससी उम्मीदवारों के लिए प्रेरणास्रोत है।

**सोशल मीडिया पर प्रेरणा की मिसाल**

अनु सोशल मीडिया पर भी बेहद लोकप्रिय हैं। इंस्टाग्राम पर उनके १.४ लाख से अधिक फॉलोअर्स हैं, जहां वे अपनी प्रेरणादायक कहानियां, अनुभव और उपलब्धियां साझा करती हैं। उनकी सकारात्मकता और प्रेरक पोस्ट्स युवाओं के लिए मार्गदर्शक बन रही हैं।

**निजी जीवन और प्रोफेशनल जोड़ी**

२०२३ में अनु ने २०२२ बैच के ही आईपीएस अधिकारी डॉ. आयुष जाखड़ से विवाह किया। आयुष, रिटायर्ड आईपीएस दिलीप जाखड़ के पुत्र हैं और वर्तमान में मध्य प्रदेश के करैरा (शिवपुरी) में एसडीओपी के पद पर तैनात हैं। यह जोड़ी प्रशासनिक और सोशल मीडिया हलकों में खासी चर्चित है।

# बाबा वेंगा भाकीत : बापरे! २०२६ मध्ये सोन्याचा दर किती असेल? भाकीत जाणून धक्का बसेल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

बाबा वेंगा २०२६ मधील गोल्ड प्राईस प्रेडिक्शननुसार २०२६ मध्ये जागतिक आर्थिक संकट (‘ कॅश क्रॅश ’) येण्याची शक्यता आहे. यामुळे चलन प्रणालीत व्यत्यय, बँकिंग संकट आणि बाजारात तरलतेचा अभाव निर्माण होऊ शकतो.

**वाढीमागची मुख्य कारणे**

■ अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प यांनी लावलेले जादा आयात शुल्क
■ व्यापारयुद्धाचा धोका ■ आंतरराष्ट्रीय तणाव ■ वाढलेली महागाई
■ जागतिक अर्थव्यवस्थेवरील परिणाम

**सध्याचा सोन्याचा दर आणि कारणे**

■ सोने हा मौल्यवान धातू अलीकडे खूपच महाग झाला आहे.
■ भारतात एमसीएक्सवर १० ग्रॅम सोन्याचा भाव १ लाख रुपयांवर पोहोचला.



**२०२६ मध्ये सोन्याचा दर काय असेल? (बाबा वेंगा भाकितानुसार)**

■ २०२६ मध्ये जागतिक मंदी आल्यास सोन्याची मागणी वाढेल.
■ लोक आर्थिक अस्थिरतेपासून संरक्षणासाठी सोन्यात गुंतवणूक करतील.
■ ऐतिहासिकदृष्ट्या, संकटकाळात सोन्याच्या किमतीत २०-५० टक्के वाढ होते.
अंदाज
■ २५-४० टक्के वाढ होऊ शकते.
■ दिवाळी २०२६ (ऑक्टोबर-नोव्हेंबर) पर्यंत.
१० ग्रॅम सोन्याची किंमत १,६२,५०० रुपये ते १,८२,००० रुपये.

(टीप : हा अंदाज जागतिक अनिश्चितता आणि मागणीवर आधारित आहे. बाबा वेंगाच्या भाकिताची खात्री नाही.)

**सोन्याच्या किमती विक्रमी उच्चांकावर का?तज्ज्ञांचे मत :**

■ ही वाढ फक्त सणासुदीच्या मागणीमुळे नाही.
■ जागतिक वित्तीय व्यवस्थेतील बदलांचे संकेत आहेत.

**मुख्य घटक :** ■ व्याजदरांवरील अनिश्चितता ■ भू-राजकीय संघर्ष ■ जागतिक मंदीचा अंदाज ■ गुंतवणूकदार सुरक्षित आश्रय म्हणून सोन्याकडे वळत आहेत.

**ट्रम्प यांचे विधान आणि बाजार**

■ चीनवर १०० टक्के कर लादणे शाश्वत नाही. ट्रम्प यांचे विधान.
■ यामुळे व्यापार तणाव काही काळ कमी झाला.
गुंतवणूकदारांना नफा मिळाला.
■ पण आर्थिक अस्थिरता कायम असल्याने बाजारात अस्थिरता वाढण्याची भीती.

**२०२६ सोन्याचा अंदाज**

| कालावधी | १० ग्रॅम सोन्याचा भाव (अंदाज) |
|---|---|
| सध्याचा (२०२५) | १ लाख रूपये |
| दिवाळी २०२६ (भाकितानुसार) | १ लाख ६२ हजार ५०० रुपये ते १ लाख ८२ हजार ००० रुपये |

(सावधानी : हे भाकीत आहे. वास्तव नाही. गुंतवणूक करताना तज्ज्ञांचा सल्ला घ्या.)

# रेखा ते रणबीर कपूर : बॉलीवूडचे ‘ हे ’ कलाकार इन्स्टाग्रामपासून राहतात दूर!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सोशल मीडिया हे आज सामान्यांपासून सेलिब्रिटीपर्यंत सर्वांचे आवडते माध्यम बनले आहे. इन्स्टाग्रामवर फोटो, व्हिडिओ आणि अपडेट्स शेअर करून लाखो फॉलोअर्स मिळविणे सोपे झाले आहे. पर्यावरण, खाद्यसंस्कृती, डान्स, गाणी किंवा व्यावसायिक प्रचार सर्व काही येथे मिळते. बॉलीवूड कलाकारही यावर सक्रिय आहेत. जसे- आलिया भट्ट, प्रियांका चोप्रा आणि जान्हवी कपूर. मात्र काही दिग्गज कलाकार इन्स्टाग्रामपासून दूर राहतात. कारण? खासगी आयुष्याचे संरक्षण किंवा सोशल मीडियाच्या व्यसनापासून दूर राहणे. चला, अशा कलाकारांची यादी पाहूया (२०२५ पर्यंतच्या माहितीप्रमाणे).

इन्स्टाग्राम वापरत नसलेले बॉलीवूड कलाकार

**१) सैफ अली खान**

व्यस्त अभिनेता असूनही सैफ इन्स्टाग्रामवर नाही. त्यांची पत्नी करीना कपूर खान मात्र सक्रिय आहे. सैफचे अपडेट्स तिच्या अकाउंटवरून मिळतात. सैफला सोशल मीडियाची गरज वाटत नाही, असे त्यांनी एका मुलाखतीत सांगितले.

**२) रणबीर कपूर**

आघाडीचे अभिनेते असले तरी रणबीरकडे इन्स्टाग्राम अकाउंट नाही. फॅन पेजेस भरपूर आहेत. मात्र रणबीर सोशल मीडियापासून दूर राहतात. करण जोहरने एकदा सांगितले, की रणबीर सोशल मीडियावर घडणाऱ्या गॉसिपची माहिती घेतात. स्वतः सहभागी होत नाहीत.

**३) राणी मुखर्जी**

राष्ट्रीय पुरस्कारप्राप्त अभिनेत्री राणी मुखर्जी इन्स्टाग्राम वापरत नाहीत. त्या खासगी आयुष्याला प्राधान्य देतात. फक्त मुलाखतींमधून अपडेट्स देतात.

**४) रेखा**

७१ वर्षीय दिग्गज अभिनेत्री रेखा इन्स्टाग्रामपासून दूर आहेत. त्या लाइमलाइटपासून दूर राहण्यास प्राधान्य देतात. फॅन पेजेसवर त्यांच्या जुन्यांचे अपडेट्स असतात. ‘ द कपिल शर्मा शो ’वर त्या म्हणाल्या होत्या, की बॉलीवूडच्या घडामोडींची माहिती त्यांना असते. सोशल मीडियावर नाहीत.

**५) आमिर खान**

‘ मिस्टर परफेक्शनिस्ट ’ आमिर खान इन्स्टाग्रामवर नाहीत. त्यांच्या निर्माती कंपनीचे अकाउंट आहे. वैयक्तिक नाही. आमिर सोशल मीडियाला वेळ वाया घालविण्याचे माध्यम मानतात.

**इतर कलाकार**

अमृता सिंह : अभिनेत्री आणि अभिनेता इब्राहिम अली खानची आई अमृता इन्स्टाग्राम वापरत नाहीत.

जया बच्चन : दिग्गज अभिनेत्री आणि राजकारणी जया बच्चन सोशल मीडियापासून दूर राहतात. खासगी आयुष्याला प्राधान्य देतात.

सोशल मीडिया लोकप्रिय असले, तरी हे कलाकार त्यापासून दूर राहून आपले करिअर आणि खासगी आयुष्य संतुलित ठेवतात. हे दाखवते, की प्रसिद्धी ही नेहमीच ऑनलाइन उपस्थितीवर अवलंबून नसते.



हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7011004040, 7011004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com

# महाराष्ट्रातील कापसाची थेट मध्य प्रदेशात विक्री

## वाढीव दर अन् ‘ ही ’ आहेत कारणे



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

यंदा हवामानातील अनिश्चिततेमुळे कापसाचे उत्पादन घटले आहे. त्यामुळे शेतकरी कापूस घरात येताच विक्री करत आहेत. मात्र सीसीआयची खरेदी केंद्रे अजूनही अनेक ठिकाणी बंद आहेत. यातच रोख पैसे आणि वाढीव दर मिळत असल्याने उत्पादक शेतकरी कापूस खेतिया (मध्य प्रदेश) येथे विक्रीसाठी घेऊन जात आहेत.

नंदुरबार जिल्ह्यातील काही भागांत अतिवृष्टीमुळे कापूस पिकाचे नुकसान झाले आहे. काही भागांत कापसावर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने पिके खराब झाली.

आधीच हवामानातील अनिश्चिततेमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न घटलेले आहे. यातच सीसीआयचे नंदुरबार आणि शहादा येथील केंद्र बंद असल्याने जिल्ह्याचा कापूस खेतिया येथे विक्रीसाठी रवाना होत आहे.

जिल्ह्यातील कापूस उत्पादक शेतकरी या हंगामाची आतुरतेने वाट पाहत होते. मात्र पावसाने वेळोवेळी दिलेला खंड, त्यानंतर काही भागांतील अतिवृष्टी, पुन्हा ढगाळ हवामान यामुळे कापूस पिकाची गुणवत्ता घटली होती. यात भर म्हणून जिल्ह्यात बहुतांश भागात कापसावर लाल्याचा प्रादुर्भाव निर्माण झाला आहे. यामुळे उत्पादनात घट आली आहे.

### सीसीआय केंद्रे बंदच!

नंदुरबार जिल्ह्यात शहादा आणि नंदुरबार या दोन ठिकाणी सीसीआयची केंद्रे आहेत. ही दोन्ही केंद्रे दिवाळीनंतर सुरू होणार आहेत. तोपर्यंत बहुतांश शेतकरी खेतिया येथील बाजारात कापूस विक्रीसाठी घेऊन जात असल्याची माहिती समोर आली आहे. या ठिकाणी व्यापारी कापसाला प्रतिक्विंटल कमीत कमी ६ हजार २०० ते जास्तीत जास्त ७ हजार ६३५ रुपये दर मिळत आहे. पैसेही रोख मिळत असल्याने शेतकरी येथे हजेरी लावत आहेत. शहादा मार्गाने खेतियाकडे कापूस घेऊन जाणारे शेतकरी सध्या नजरेस पडत आहेत. सीसीआयने प्रतिक्विंटल ७ हजार ७१० रुपये हमीभाव केंद्रीय स्तरावरून जाहीर केला असला, तरी खरेदी केंद्र प्रत्यक्षात सुरू होण्यास नोव्हेंबरअखेर उजाडणार आहे. यामुळे शेतकरी खासगी विक्रेते किंवा लगतच्या मध्य प्रदेशातील खेतिया येथील बाजारात



# श्री रायरेश्वर महादेव मंदिराचे रामेश्वर नगरात भूमीपूजन

## आमदार अनिलदादा पाटलांनी केली महापूजा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शहरातील रामेश्वर नगर परिसरात श्री रायरेश्वर महादेव मंदिराच्या कामाचे भूमीपूजन शुक्रवार, दि. २४ ऑक्टोबर रोजी माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी अनिलदादा पाटील यांनी महापूजा केली. माजी नगरसेवक विक्रांत पाटील, प्रताप शिंपी, साहेबराव पवार, माजी उपनगराध्यक्ष विनोद लांबोळे, अर्बन बँकेचे माजी चेअरमन रणजीत शिंदे, भाजपचे जिल्हाध्यक्ष योगेश महाजन, सामाजिक कार्यकर्ते राकेश शेटे, गोकुळ पाटील, दिनेश शेटे, सोनू पाटील, भूषण मराठे व शरद पाटकरी आदी उपस्थित होते. रामेश्वर नगर मित्र परिवाराच्या पुढाकाराने हे मंदिर उभारण्यात येत आहे.

# पिंगळवाडेत तिघांना मारहाण; चौघांवर गुन्हा



**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भांडण सोडविल्याचा राग आल्याने चौघांकडून तीन जणांना बेदम मारहाण झाली. ही घटना मंगळवार, दि.२१ रोजी तालुक्यातील पिंगळवाडे येथे घडली. याप्रकरणी मारवड पोलस ठाण्यात चौघांविरूद्ध गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

पोलिसांनी सांगितले, की २१ ऑक्टोबर रोजी सकाळी पिंगळवाडे येथे नवल साहेबराव पाटील, दीपक विठ्ठल देशमुख, विठ्ठल केशव देशमुख यांच्यात सांडपाण्यावरुन भांडण झाले होते. विजय पोपट देशमुख यांनी मध्यस्थी करत ते भांडण सोडवले होते. २२ ऑक्टोबर रोजी सकाळी आठ वाजता विजय देशमुख हे किराणा दुकानावर गेले. त्याठिकाणी अमोल विठ्ठल देशमुख याने विजय देशमुख यांचा गळा पकडून जीवे मारण्याची धमकी दिली. दीपक विठ्ठल देशमुख याने त्यांच्या छातीवर बसून चापट बुयांनी मारहाण केली. फिर्यादीला सोडविण्यासाठी त्यांची पत्नी मंदाबाई देशमुख व भाऊ सुरेश देशमुख हे आले असता त्यांना ही मारहाण करण्यात आली. ग्रामस्थांनी त्यांची सोडवणूक केली. हवालदार संजय पाटील तपास करीत आहेत.



## तुम्हीच व्हा..! पत्रकार

अनेकांना पत्रकार होण्याची सुप्त इच्छा असते. मात्र त्यासाठी काय करावे ? आपल्याला ते जमेल का ? आपल्याला लिहिता येईल का? सर्वच वृत्तपत्रांनी पुरेशा संख्येत त्यांचे अधिकृत प्रतिनिधी नेमले आहेत मग आपल्याला कोण संधी देईल?

ती संधी आम्ही आपणास उपलब्ध करून देत आहोत. खास करून आपल्या भागातील किंवा अमळनेर विधानसभा मतदारसंघातील कोणतीही समस्या, निधन वार्ता , विवाह वार्ता शक्यतो फोटोसह आम्हास लिहून कळवा. आपल्याला जसे लिहिता येईल तसे लिहा. त्यास आम्ही बातमीचे स्वरूप देऊ. त्याखाली वाचक पत्रकार म्हणून आपले नावही प्रसिद्ध करू. आपले नाव गोपनीय ठेवावे अशी आपली इच्छा असल्यास आपले नाव प्रसिद्ध केले जाणार नाही. बातमी चांगली असल्यास आपल्या फोटोसह प्रसिद्ध करू. आपणास लिहिण्याची इच्छा नसल्यास काही विषयांवर आम्हीच लिहावे, त्यास व्यापक प्रसिद्धी द्यावी असे आपणास वाटत असल्यास आम्हास आपण आपल्या मतदारसंघातील विषय ही सुचवू शकता. चला तर मग होऊया आपण पत्रकार. फोडू या समस्यांना वाचा. देऊयात चांगल्या कार्यांना प्रसिद्धी.

| बातमीसाठी संपर्क : | जाहिरातीसाठी संपर्क : |
|---|---|
| रजनीकांत पाटील : 8788441234 | शरद कुलकर्णी: 9922547800 |
| योगेश महाजन : 9850576058 | रजनीकांत पाटील : 8788441234 |
| भरत पाटील : 9922408434 | |

# टाकरखेडेच्या तरुणाचा मोटारसायकल अपघातात मृत्यू



मयत ज्ञानेश्वर पाटील

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर तालुक्यातील टाकरखेडा येथील ज्ञानेश्वर पुंडलिक पाटील (वय ३०) याचा मोटारसायकल अपघातात मृत्यू झाला. ही घटना शुक्रवार, दि. २४ ऑक्टोबर रोजी सायंकाळी सातच्या सुमारास टाकरखेडा येथील पेट्रोलपंपासमोर ही घटना घडली. तो अमळनेरहून मोटारसायकलने गावाकडे परतत असताना मोटारयायकलची बैलगाडीला जोरदार धडक दिल्याने तो गंभीर जखमी झाला. त्याला अमळनेर येथील खासगी रुणालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. त्याच्या पश्चात आई, भाऊ व एक बहीण असा परिवार आहे. त्याच्या मृत्यूने पंचक्रोशीत हळहळ व्यक्त होत आहे.

# जाहिरातींचे सर्जक पद्मश्री पीयूष पांडे यांचे निधन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



‘ दो बुंदें जिंदगी की ’, ‘ कुछ खास है ’, ‘ हर घर कुछ कहता है ’ अशा अनेक अविस्मरणीय जाहिरातींचे सर्जक पद्मश्री पीयूष पांडे (वय ७०) यांचे शुक्रवार, दि. २४ ऑक्टोबर रोजी निधन झाले. पांडे यांच्या निधनामुळे जाहिरातींना भारतीय चेहरामोहरा देणारा जाहिरात क्षेत्रातील पितामह हरपल्याची हळहळ जाहिरात, कला क्षेत्रातील नामवंत व्यक्त करत आहेत. ‘पीयूष पांडे त्यांच्या सर्जनशीलतेसाठी ओळखले जात होते. त्यांनी जाहिरातीच्या जगात प्रचंड योगदान दिले. त्यांच्याशी वर्षानुवर्षे झालेल्या संवादांना मी जपून ठेवेन. त्यांच्या निधनाने मला खूप दुःख झाले आहे. शब्दांचा किमयागार, साक्षेपी व्यक्तिमत्त्वाला मुकलो, अशी भावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही पांडे यांच्याविषयी व्यक्त केली. ‘मिले सुर मेरा तुम्हारा ’ हे गीतही त्यांच्याच लेखणीतून साकारले होते. ‘ अबकी बार मोदी सरकार ’ हे घोषवाक्यही त्यांचाच प्रतिभेचा आविष्कार होता.




# पिंपळे माध्यमिक विद्यालयातील माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तालुक्यील पिंपळे येथील (कै.) सुकलाल आनंदा पाटील माध्यमिक विद्यालयातील दहावीतील सन २००७- ०८ बॅचच्या माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी १७ वर्षांनंतर एकत्र आजे. हा स्नेहमेळावा गुरुवार, दि. २३ ऑक्टोबर रोजी भाऊबिजचे औचित्य साधून शाळेत झाला.

यावेळी १७ माजी विद्यार्थिनी व १७ माजी विद्यार्थी सहभागी झाले होते. सेवानिवृत्त शिक्षक जगदीश पाटील अध्यक्षस्थानी होते. श्री. एस. एच. पाटील प्रमुख पाहुणे होते. समाधान पाटील, प्रगती पाटील, इंजि. राहुल पाटील, डॉ. भगतसिंग पाटील, अजित पाटील, राहुल जाधव यांनी मनोगत व्यक्त केले. भारती पाटील, वर्षा पाटील, अनिता पाटील, समाधान पाटील, फौजी सागर पाटील, रूपाली पाटील, रूपाली मिस्त्री, गजानन पाटील, भरत शिंग आदींनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. शालेय जीवनातील गंमतीजमती सांगून स्नेहमेळाव्यास रंगत आणली. चंद्रशेखर पाटील, ज्योती पाटील, साधना पाटील, रोहिदास पाटील, पिंपळे बुद्रुक, पिंपळे खुर्द, अनोरे, आटाळे, वाघोदे परिसरातील विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.

## पत्रकार कल्याण निधी योजनेचे सुभाष पाटील पहिले लाभार्थी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



(कै.) शंकरराव चव्हाण सुवर्ण महोत्सवी पत्रकार कल्याण निधी योजनेचे सुभाष पाटील- घोडगांवकर हे राज्यांतील पहिले लाभार्थी ठरले आहेत. पत्रकार पेन्शन योजनेचे तालुक्यातील ते एकमेव पत्रकार आहेत. शासनाने त्यांना एक लाख रुपयांचे अर्थसहाय्य केले आहे. हा निधी शुक्रवार, दि. २४ ऑक्टोबर रोजी त्यांच्या बँक खात्यात जमा झाला आहे. यासाठी त्यांनी जिल्हा माहिती अधिकारी कार्यालयात आठ महिन्यापूर्वी अर्ज दाखल केला होता.

# गावोगावी ग्रामगीतेचे पारायण करा !

## उमेश काटे : पातोंडा येथे ‘ संत विचारांचे जागर ’ अंतर्गत व्याख्यान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



देशाचा सर्वांगीण विकास साधायचा असेल तर गाव केंद्रस्थानी ठेवून विकासाकडे लक्ष दिले पाहिजे, असे तुकडोजी महाराजांनी आपल्या ग्रामगीतेतून सांगितले आहे. ग्राम समृद्ध व ग्राम कल्याणासाठी प्रत्येक गावात ग्रामगीतेचे पारायण झाले पाहिजे. गाव प्रगतीपथावर गेले तर देशाचा विकास साधला जाईल, असे मत शिवशाही फाउंडेशनचे सचिव तथा पत्रकार उमेश काटे यांनी केले.

महाराष्ट्र साहित्य परिषद, व पातोंडा परिसर विकास मंचतर्फे एकादशीच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील पातोंडा येथील श्री दत्त मंदिरात परिसरात झालेल्या भारतीय संत साहित्याचा जागर या व्याख्यानमालेत “राष्ट्रसंत तुकडोजी महाराज- जीवन कार्य” या विषयावर तिसरे पुष्प गुंफताना ते बोलत होते. सेवानिवृत्त आदर्श शिक्षक प्रदीप लोहारे यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. ‘ मसाप ’ चे अध्यक्ष संदीप घोरपडे अध्यक्षस्थानी होते. आदिवासी विकास विभागाचे सहाय्यक आयुक्त कपिल पवार, ‘ मसाप ’चे उपाध्यक्ष भाऊसाहेब देशमुख, प्रमुख कार्यवाह दिनेश नाईक, कार्यकारिणी सदस्य नरेंद्र निकुंभ, गोकुळ बागुल, समन्वयक मनोहर नेरकर, डी. ए. सोनवणे, एस. पी. अहिरे, सरपंच मनीषा मोरे, माजी सरपंच शितल पाटील, विलास चव्हाण, रवींद्र बोरसे, मंगेश गाडगे, योगेश्वर पाटील, संदीप पाटील, चंद्रकांत पवार आदी प्रमुख पाहुणे होते.

श्री. काटे यांनी ‘मनी नाही भाव, म्हणे देवा मला पाव... देव अशाने भेटायचा नाही रे, देव बाजारचा भाजीपाला नाही रे’ या अभंग रुपी भजनाने व्याख्यानाला सुरुवात केली. देव दगडात नाही, लाकडात नाही तर तो या भूतलावावर चराचरामध्ये वसलेला आहे. देवाची व्याप्ती फार व्यापक आहे. देव मंदिरात शोधण्यापेक्षा आपल्या कर्मामध्ये देव शोधा. संतांच्या विचारांनी माणसात माणुसकी फुलते, तुकडोजींच्या वाङ्मयातून ग्रामजागरणाचा प्रकाश पसरतो. संत तुकडोजी महाराज यांनी १९६२ च्या भारत चीन युद्ध व १९६५ च्या भारत पाकिस्तान युद्धाच्या वेळी मनोधैर्य खचलेल्या भारतीय सैनिकांचे मनोधैर्य वाढवण्यासाठी खंजिरीवादक भजनांच्या माध्यमातून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण केला होता. “ भक्ती विना देव दिसत नाही... पैशाविना संसार चालत नाही... कोणता मार्ग मी धरु... भक्ती करू की पोट भरु... सांगा मी काय करू “ हे भजनही श्री. काटे यांनी सादर केले. निरंजन पेंढारे यांनी प्रास्ताविक केले. शरद पाटील यांनी सूत्रसंचालन केले. अमित पवार यांनी आभार मानले.

ग्लोबल महातेज

आजच...! आपली जाहिरात बुक करा

दैनिक ग्लोबल महातेज उपलब्ध करून देत आहे आपणास

‘ चमकण्याची ’ तसेच आपली व्यक्तिगत, राजकीय, व्यावसायिक प्रसिद्धी जाहिरात रूपाने प्रचंड मोठ्या प्रमाणावर करण्याची सुवर्णसंधी...!





जाहिरात दर

| | | |
|---|---|---|
| १) | पूर्ण पान | 45,000/- रु. |
| २) | अर्ध पान | 25,000/- रु. |
| ३) | पाव पान (16 x 25 सें. मी.) | 13,000/- रु. |
| ४) | 16 x 13 सें. मी. | 7,000/- रु. |
| ५) | 12 x 10 सें. मी. | 4,000/- रु. |
| ६) | 8 x 10 सें. मी. | 2,500/- रु. |
| ६) | ३ वर्षांखालील बाळाचा वाढदिवस | 200/- रु. |
| ७) | शुभविवाह जाहिरात ( वधू-वराच्या रंगीत फोटोसह ) | 300/- रु. |
| ८) | लिगल नोटीस | 150/- रु. |
| ९) | उठावणा जाहिरात | मोफत |

* फ्रंट पेज साठी जाहिरात २०% जादा दर असेल. * शेवटच्या पानासाठी १०% जादा दर असेल.

रोज साडेतीन हजार पेपरचा खप असलेले ब्रॉडशिट आकारातील चारही पाने रंगीत असलेले महाराष्ट्रातील एकमेव वृत्तपत्र ...!! डिजिटल पेपरच्या सहाय्याने लाखो लोकांपर्यंत पोहोचणारा अफलातून पेपर...!!!

जाहिरात बुकिंगसाठी संपर्क
शरद कुलकर्णी : 99225 47800/95271 08678
रजनीकांत पाटील : 87884 41234

वरील सर्व दरांत नियमित जाहिरातदारांना विशेष सवलत मिळेल व बातम्यांच्या स्वरूपात मोठी प्रसिद्धी मिळेल.




# दिव्य सिद्ध मंगल स्तोत्र जन्म कधी झाला?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सन १३२० च्या गणेश चतुर्थीला श्रीपाद श्रीवल्लभ अवतरले. त्यांचा पहिलाच वाढदिवस होता. अप्पलराज शर्मा व माता सुमती श्रीपादांना घेऊन आजोबा बापन्नाचार्यांच्या घरी गेले होते. बाल श्रीपादांना मांडीवर घेऊन आजोबा श्रीपादांच्या श्रीचरणांच्या तळावरील पद्म निरखून पाहत होते. ती शुभलक्षणे दिसताच श्रीपादांचे चरण विजेसारखे लखलखू लागले. त्यामुळे बापन्नाचार्यांना ती स्पष्ट दिसत नव्हती. दुसऱ्या दिवशी पहाटे तांदूळ कुटल्याने उडालेल्या कोंड्यात बापन्नाचार्यांना दिव्य पादमुद्रा दिसल्या. त्यांनी सुमती महाराणीला विचारले, की बेटा यावरून कोण चालत गेले? सुमती माता म्हणाल्या, की दुसरे कोण? तुमचा लाडका नातू. त्या पादमुद्रा सोळा वर्षांच्या युवकाच्या वाटत होत्या. आजोबांनी श्रीपादांना मांडीवर घेतले व त्यांचे श्रीचरण पाहताच त्यावर सर्व शुभलक्षणे स्पष्ट दिसत होती, जी श्रीपाद दत्तावतार आहेत याची सूचक होती. बापन्नाचार्यांनी श्रीपादांच्या दिव्य चरणांचा मुका घेतला. हे बालक दत्तप्रभूच आहे, याबद्दल त्यांची खात्री पटली. त्यांच्या नेत्रांतून अश्रूधारा व मुखातून सहजपणे काही पदे बाहेर पडत होती. तेच ते दिव्य सिद्ध मंगल स्तोत्र. श्रीपाद आजोबांचे अश्रू पुसत सांगतात, की सोळा वर्षांपर्यंत घरी राहणार. संसार बंधनातून मुक्त होऊ शकते इच्छिणाऱ्या मुमुक्षुंवर मला अनुग्रह करायचा आहे. मी चिरंजीव असे तुम्हाला वाटते ते खरे आहे. यावेळी एक वर्षाचे श्रीपाद सांगतात, की मी गोकर्ण क्षेत्राला अधिकाधिक शक्तिवंत करू इच्छितो. या वचनानुसार वयाच्या सोळाव्या वर्षी २५ मे १३३६ रोजी पिठापूर सोडल्यावर काशी, प्रयाग, सिद्धाश्रम, नेपाळ करून श्रीपाद श्रीवल्लभ गोकर्ण महाबळेश्वर येथे आले व त्यांनी तीन वर्षे येथे वास्तव्य केले. याच वास्तव्यात बाल रामचंद्र योगेश्वर (ज्यांची नृसिंहवाडी येथे मनोहर पादुकांच्या मागे संजीवनी समाधी आहे) यांना श्रीपादांनी ताब्यात घेऊन संगोपन केले.

श्रीपादांनी आजोबांना सांगितले, की तुम्ही सौर शक्तिपात केलेले श्रीशैल्य मल्लिकार्जुन शिवलिंग मी अधिक शक्तिशाली करणार आहे. त्यानुसार गोकर्ण येथील तीन वर्षांच्या वास्तव्यानंतर श्रीपाद तडक श्रीशैल्य येथे आले. त्यावेळी त्यांनी येथे चार महिने वास्तव्य केले. या काळात श्रीपाद तेजोरूपात सूर्यलोकात, हिरण्यलोकात, सप्तर्षीलोकात जाऊन आले. तसेच श्रीशैल्य क्षेत्रातील पात्र ऋषींना त्यांनी सप्तर्षी लोकात नेऊन स्थानापन्न केले.

श्रीपादांनी आजोबांना सांगितले, की नृसिंह सरस्वती म्हणून अवतरल्यानंतर कर्दळीवनात तीनशे वर्षे तप करून प्रज्ञापुरला (अक्कलकोट) स्वामी समर्थ म्हणून राहिल्यानंतर मल्लिकार्जुन शिवलिंगात विलीन होणार. खरोखरच सन १८७८ मध्ये स्वामी समर्थ रूपाची समाधी झाल्यावर श्रीपाद श्रीवल्लभ आठ वर्षे म्हणजे सन १८७८ ते १८८६ या काळात मल्लिकार्जुन शिवलिंगात गुप्त राहिले.

१८८६ मध्ये रामकृष्ण परमहंस देह सोडतेवेळी साईबाबांना कलकत्त्याला धक्षिणेश्वरी काली मंदिरात बोलावून घेण्यात आले. तेथे रामकृष्ण परमहंसांच्या शिष्यांची जबाबदारी साईबाबांना देण्यात आली. तसेच कालीमाता म्हणजे श्री वासवी कन्यका परमेश्वरी कन्यकांबा व श्रीपादांनी स्वतःला साईबाबांमध्ये निक्षेपित केले.

साईबाबांचे ते पडक्या, मातीच्या मशिदीत राहणे, कफनी घालणे, भिक्षा मागणे, यवनी भाषा बोलणे यावरून जर कोणी त्यांच्याबद्दल काही समज करून घेत असेल ते खूप गैर आहे. साई अवतार हा मानवी आकलनाच्या खूप पलीकडील आहे.

### श्रीसिद्धमङ्गलस्तोत्रम्

श्रीमदनन्त श्रीविभूषित अप्पललक्ष्मीनरसिंहराज ।
जय विजयी भव दिग्विजयी भव श्रीमदखण्ड श्रीविजयी भव ॥ 1॥
श्रीविद्याधरी राधासुरेखा श्रीराखीधर श्रीपाद ।
जय विजयी भव दिग्विजयी भव श्रीमदखण्ड श्रीविजयी भव ॥ 2॥
माता सुमती वात्सल्यामृत परिपोषित जय श्रीपाद ।
जय विजयी भव दिग्विजयी भव श्रीमदखण्ड श्रीविजयी भव ॥ 3॥
सत्यऋषिश्वर दुहितानन्दन बापनार्यनुत श्रीचरण ।
जय विजयी भव दिग्विजयी भव श्रीमदखण्ड श्रीविजयी भव ॥ 4॥
सवितृकाठकचयनपुण्यफल भारद्वाजऋषिगोत्रसम्भव ।
जय विजयी भव दिग्विजयी भव श्रीमदखण्ड श्रीविजयी भव ॥ 5॥
दो चौपाती देव लक्ष्मिगणसङ्ख्याबोधित श्रीचरण ।
जय विजयी भव दिग्विजयी भव श्रीमदखण्ड श्रीविजयी भव ॥ 6॥
पुण्यरूपिणी राजमाम्बसुतगर्भपुण्यफलसञ्जात ।
जय विजयी भव दिग्विजयी भव श्रीमदखण्ड श्रीविजयी भव ॥ 7॥
सुमतीनन्दन नरहरीनन्दन दत्तदेव प्रभु श्रीपाद ।
जय विजयी भव दिग्विजयी भव श्रीमदखण्ड श्रीविजयी भव ॥ 8॥
पीठिकापुर-नित्यविहारा मधुमतीदत्ता मङ्गलरूपा ।
जय विजयी भव दिग्विजयी भव श्रीमदखण्ड श्रीविजयी भव ॥ 9॥
**इति श्रीसिद्धमङ्गलस्तोत्रं सम्पूर्णम् ।**



## गुरू द्वादशी आणि श्रीपादांची तीन वचने!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आश्विन वद्य द्वादशीला १३५० मध्ये श्रीपाद श्रीवल्लभ स्वामींनी लौकिकदृष्ट्या फक्त तीस वर्षांचे असताना आपले शरीर लौकिकार्थाने कृष्णा नदीमध्ये का गुप्त केले, याचा पूर्ण संदर्भ श्रीपाद श्रीवल्लभ संपूर्ण चरितामृत ग्रंथात अध्याय चारमध्ये येतो. श्रीपादांना देह गुप्त ठेवायची एवढी घाई का होती. त्याला कारण श्रीपादांनी सहोदरी श्री वासवी कन्यका परमेश्वरी माता, शिवशर्मा व अंबिका यांना तीन वेगवेगळ्या वेळी कुरवपूर येथे दिलेले वचन आहेत. या तिन्ही वचनांना साक्षीभावाने पाहणारे आहेत ते चिदंबरम. २५ मे १३३६ या दिवशी पळणी स्वामींचे ध्यान करण्यात आले. श्रीपादांना याच दिवशी अवतार समाप्ती करावयाची होती. त्यांनी तशी इच्छा वासवी कन्यकांबेस बोलून दाखविली. यावर कन्यकांबेने श्रीपादांना ती वेळ पुढे ढकलायला लावली.

श्रीपादांनी दुसरे वचन दिले ते शिव शर्मांना. उदास शिव शर्मांना श्रीपाद म्हणाले, की इतर सर्व विसरून निरंतर माझेच ध्यान करणाऱ्याचा मी गुलाम असतो. तुझी व्यथा व इच्छा मला सांग. या भक्तांचा गुलाम शब्दांत अवतार समाप्तीचे रहस्य दडलेले आहे. शिव शर्मा स्वतःच्या मंदमती मुलाची व्यथा सांगून त्याला बृहस्पतीप्रमाणे विद्वान करण्याची इच्छा व्यक्त करतात.

श्रीपादांनी तिसरे वचन दिले. ते शिव शर्मा वारल्यानंतर भिक्षा मागून मंदमती मुलासह जगणाऱ्या शिव शर्मांच्या पत्नीला म्हणजे अंबिकेला. तिला आत्महत्येपासून वाचवून श्रीपाद तिला वचन देतात, की तुला तुझ्या पुढच्या जन्मात माझ्यासारखा पुत्र होईल व माझ्यासारखा मीच असल्याने मीच तुझ्यापोटी येईल. आता अंबिका तर वृद्ध होऊन कुरवपुरात मरण पावली. लाड कारंजा येथे अंबिका नावानेच जन्मून माधवासह संसार करती झाली. पण श्रीपादांची वचनपूर्ती राहिली होती ना की जिची स्मृती या लाड कारंजातील अंबिकेला नव्हती. पण वचन देणारे साक्षात श्रीमन्नारायण श्रीपाद कसे विसरतील.

श्रीपाद १३५० च्या आश्विन वद्य द्वादशीला काही क्षणात शंकर भट्टांस सांगतात, की बेटा गुप्त रूपात राहण्याची माझी वेळ जवळ आली आहे. पुत्रासमान सेवा करत तू माझ्या समीप राहिलास. माझ्या या पादुका तुला देत आहे. मी येथेच गुप्त रूपात राहणार आहे व नरसिंह सरस्वती नावाने अवतरणार आहे. येथे श्रीपाद आपले चौथे वचन शंकर भट्टांस देताना सांगतात, की मी तुला रोज मध्यरात्री तीन वर्षे तेजोरूपात दर्शन देऊन अनेक योग रहस्ये सांगेन.

आश्विन वद्य द्वादशीला श्रीपाद म्हणजे गुरू गुप्त झाले म्हणून या तिथीला ' गुरू द्वादशी ' संबोधण्यात येते. आजच्या या अतिपुण्यशाली दिवशी आपणही श्रीपादांकडून वचन मिळविण्यासाठी गुरूकृपापात्र होऊयात.



## जगातील सर्वांत उंच अन् विलोभनीय मेहकर येथील शारंगधर बालाजी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

तिरुपतीमधील श्री बालाजींच्या मूर्तीपेक्षाही सुंदर अन् विलोभनीय अशी जगातील सर्वांत उंच शारंगधर बालाजींची मूर्ती विदर्भातील मेहकर येथे विराजमान आहे. ११.२ फूट उंच अन् अडीच फूट जाडी असलेल्या मूर्तीचे सौंदर्य तिच्या भव्यतेमुळे अधिकच खुलून दिसते. या मूर्तीचा इतिहासही रंजक आहे. पुरातन काळातील ही मूर्ती अठराव्या शतकात गावकऱ्यांना खोदकाम सुरू असताना सापडली. इंग्रज अधिकाऱ्यांनी मूर्तीसह शिलालेख अन् दागिने ताब्यात घेतले. ही मूर्ती लंडनच्या संग्रहालयात हलवली जाणार होती. गावकऱ्यांनी प्राणांची बाजी लावत तिची रातोरात प्राणप्रतिष्ठा केली. संतापलेल्या इंग्रज अधिकाऱ्यांनी शिलालेख, दागिने लंडनला नेले. मूर्ती मात्र ते नेऊ शकले नाहीत. तेव्हा इंग्रजांनी मेहकरच्या ६० गावकऱ्यांना तुरुंगात डांबले होते. यात जानकीरामआप्पा पाठक, रामभाऊ भिते पाटील, ॲड. मा. ल. देशमुख, निंभा गोंधळी, रामा कुणबी, विठ्ठल माळी आदींचा समावेश होता.

संभाजीनगरपासून १२५ कि.मी. अंतरावर विदर्भात मेहकर हे गाव आहे. नागपूर-मुंबई महामार्गावर हे गाव असूनही जगाला या अद्भुत मूर्तीसह मंदिराची माहितीच नाही. पैनगंगा नदीकाठी जुन्या लाकडी, परंतु अत्यंत रेखीव वाड्यात हे मंदिर आहे. मोठ्या काळ्या पाषाणावर ही मूर्ती कोरलेली असून, तिच्याभोवती प्रभावळ आहे. त्यावर विष्णूंचे १० अवतार चितारले आहेत. मूर्ती मध्ययुगीन आहे.

मूर्तीचा शोध लागण्यापूर्वी हे गाव नृसिंहांचे स्थान म्हणून ओळखले जात होते. येथे लक्ष्मीनृसिंहांचे प्राचीन मंदिर आहे. ही मूर्तीदेखील एका भुयारात होती. १५ व्या शतकात ती गावकऱ्यांनी गावात आणली. त्यानंतर ३१९ वर्षांनी गावात शारंगधर बालाजी यांची मूर्ती सापडली. इ.स. १८८८ मध्ये पोलीसपाटील रामभाऊ भिते यांच्या गढीत खोदकाम करताना २० फूट लांब फूट रुंद लोखंडी पेटीत ही मूर्ती होती. मूर्तीवर चंदनाचा भुसा होता. सोबत दोन ताम्रपट होते. त्यावर मूर्तीचा इतिहास लिहिलेला होता. तो दिवस होता नागदीपावलीचा. मार्गशीर्ष शुद्ध पंचमी, गोरज मुहूर्तावर डिसेंबर १८८८ ला मूर्ती सापडल्याने तोच दिवस गेल्या सव्वाशे वर्षांपासून प्रकटदिन म्हणून साजरा केला जातो.

### असे आहेत शारंगधर बालाजी

रेखीव मूर्ती, छाती पोट गोमुखाकृती. मूर्ती चतुर्भुज असून हातात गदा, चक्र, पद्म आहे. पायाजवळ जय-विजय, लक्ष्मी-कुबेर भूदेवी. हातातील शस्त्रांत धनुष्य नाही. मात्र मूर्तीभोवती प्रभावळीत विष्णूंचे दहा अवतार कोरले आहेत. डोक्यावर शारंग नावाची धनुष्य धारण केलेली विष्णूंची मूर्ती कोरली आहे. म्हणून हा शारंगधर. ही मूर्ती आशिया खंडातील सर्वांत मोठी श्री बालाजींची मूर्ती आहे. तसा उल्लेख बुलडाणा जिल्ह्याच्या गॅझेटियरमध्ये आहे. तीर्थक्षेत्रांच्या यादीत या मंदिराचे नाव असले, तरी याला अद्याप हवी तेवढी प्रसिद्धी मिळालेली नाही. जालन्यापासून वाशीमकडे जाणाऱ्या रस्त्यावर मेहकर आहे.



## घराचे मुख्य द्वार व त्याचे उपाय

- पूर्व द्वार : बाहेरून तांब्याचा सूर्य
- उत्तर पूर्व मुखी द्वार : बाहेरून पितळेची तार
- उत्तर मुखी द्वार : आतून-बाहेरून गणपती बाप्पांची प्रतिमा
- उत्तर पश्चिम मुखी द्वार : बाहेरून स्टीलची तार
- पश्चिम मुखी द्वार : बाहेरून घोड्याची नाल
- दक्षिण पश्चिम द्वार : बाहेरून घोड्याची नाल किंवा नावेचा नट किंवा खिळा
- दक्षिण मुखी द्वार : बाहेरून पंचमुखी हनुमानाची तसबीर
- दक्षिण पूर्व मुखी द्वार : बाहेरून ओम किंवा स्वस्तिक चिन्ह लावणे.

## धणे, गुळाच्या नैवेद्याचे महत्त्व का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



धनत्रयोदशी म्हणजेच दिवाळीच्या सणाची सुरूवात. हा दिवस धन्वंतरी, माता लक्ष्मी आणि भगवान कुबेर यांच्या पूजेसाठी खास मानला जातो. या दिवशी धणे आणि गुळाचा नैवेद्य दाखविण्याची परंपरा आहे. जी केवळ धार्मिकच नव्हे तर आयुर्वेदिक दृष्टिकोनातूनही अत्यंत महत्त्वाची आहे. हा प्रसाद आपल्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर आहे. धनत्रयोदशीला हा नैवेद्य का खावा आणि त्याचे कोणते ५ फायदे आहेत, जाणून घ्या.

**१) मूत्रमार्गाच्या विकारांवर गुणकारी :** धणे हे मूत्रमार्गाच्या अनेक विकारांवर उपयुक्त ठरतात. यामुळे मूत्रविकार, जळजळ किंवा इतर त्रास कमी होण्यास मदत होते. विशेषतः धनत्रयोदशीच्या काळात बदलत्या हवामानामुळे होणाऱ्या मूत्रमार्गाच्या समस्यांवर धणे हा नैसर्गिक उपाय आहे.

**२) पांढऱ्या पाण्याच्या त्रासावर उपाय :** अनेक महिलांना अंगावरून पांढरे पाणी जाण्याचा त्रास होतो. धन्यांमध्ये असलेले औषधी गुणधर्म या समस्येला कमी करण्यास मदत करतात. धणे आणि गूळ यांचे संयोजन या त्रासावर प्रभावी ठरते, असे आयुर्वेदात सांगितले जाते.

**३) पचनक्रिया सुधारते, बद्धकोष्ठता कमी करते :** धणे पचनक्रिया सुधारण्यासाठी प्रसिद्ध आहे. बद्धकोष्ठता, ॲसिडिटी आणि त्वचारोग यांसारख्या समस्यांवर धणे उपयुक्त ठरतात. धनत्रयोदशीच्या काळात दिवाळीच्या मिष्टान्नांचे सेवन वाढते. त्यामुळे पचनसंस्थेवर ताण येऊ शकतो. अशा वेळी धणे आणि गूळ पचनक्रिया मजबूत ठेवण्यास मदत करतो.

**४) गूळ : रक्तशुद्धी आणि ऊर्जेचा स्रोत :** गूळ हा रक्तशुद्धीसाठी आणि शरीराला ऊर्जा देण्यासाठी ओळखला जातो. यामुळे थकवा, अशक्तपणा यांसारख्या समस्या कमी होतात. गुळामध्ये लोह, कॅल्शियम आणि इतर पोषक घटक असतात, जे शरीराला ताकद देतात. विशेषतः दिवाळीच्या धावपळीत गूळ आणि धणे थकवा घालविण्यासाठी उपयुक्त आहे.

**५) शरीराला आराम आणि ताजेपणा :** धणे आणि गूळ यांचे एकत्रित सेवन शरीरावरील ताण कमी करते. शरीराला आराम मिळवून देते. दिवाळीच्या आधीच्या धावपळीमुळे आणि सणाच्या तयारीमुळे शरीर थकते. हा नैवेद्य खाल्ल्याने शरीराला ताजेपणा मिळतो आणि सणाचा उत्साह टिकून राहतो. आयुर्वेदानुसार हे संयोजन शरीरातील उष्णता कमी करून संतुलन राखते.

**धार्मिक आणि वैज्ञानिक महत्त्व :** धनत्रयोदशीला धन्वंतरी (आयुर्वेदाचे देवता), लक्ष्मी (समृद्धीची देवी) आणि कुबेर (धनाची देवता) यांची पूजा केली जाते. धणे आणि गूळ यांचा नैवेद्य दाखविणे ही परंपरा आरोग्य आणि समृद्धी यांचे प्रतीक आहे. या नैवेद्याचे सेवन केल्याने केवळ शारीरिक फायदेच नाहीत, तर सणाच्या पवित्र वातावरणात मानसिक शांतीही मिळते.


